
# ज्ञान प्रबोधिनी
# नवनगर विद्यालय
# निगडी
# पूर्व माध्यमिक विभाग



# पूर्व माध्यमिक विभाग : औपचारिक शिक्षण विभाग

- इयत्ता ५ वी ते ७ वी
- विद्यार्थी संख्या ३५८
- पाचवी पासून गणित व विज्ञान या  दोन विषयांचे  इंग्रजी भाषेतून अध्यापन.
- इयत्ता पाचवी शासकीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अभ्यास वर्ग.
- निरीक्षण, प्रश्न, संवाद कौशल्य विकसित होण्याच्या उद्देशाने विशेष प्रयत्न.
- विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिकविकसनाच्या दृष्टीने वर्षभर उपक्रमांची नियोजनपूर्वक रचना

# विभागाची उद्दिष्टे : अनुभव शिक्षणाच्या साथीने क्रमिक शिक्षण

- पाठ्यपुस्तकी शिक्षणाला अनुभव शिक्षणाची नियोजनपूर्वक जोड.
- व्यक्तिमत्त्व विकसनाच्या दृष्टीने दिशादर्शक ठरणारे नाट्य, संगीत, नृत्य, वादन, हस्तकला, चित्रकला या कलाविषयांचा परिचय व प्रशिक्षणपर नियमित तासिकांचा समावेश. विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती विकसनास पोषक वातावरण व तज्ज्ञांचे मार्गदर्शन
- शालाबाह्य स्पर्धा परीक्षात सहभाग आणि तयारीपूर्वक सहभाग

# विभागाची उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनासाठी प्रयत्न करणे.
- 
- अभिव्यक्ती विकसन योजनेद्वारे विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखणे.
- पाठ्यपुस्तकी शिक्षणाला अनुभव शिक्षणाची जोड देणे.
- विविध स्पर्धा व परीक्षा यांची उत्तम तयारी करून घेणे.

# विभाग रचना

### श्री. शिवराज पिंपुडे M.A. B. Ed.

- विभाग प्रमुख
- इतिहास अध्यापक
- माजी विद्यार्थी
- २० वर्षांचा  अनुभव
- अनुभव शिक्षणातील अनेक यशस्वी प्रयोग

### श्री. समाधान सुसर

- सहाय्यक विभाग प्रमुख
- मराठी व गणित विषय अध्यापक
- नियोजनबध्द कामाची आखणी
- गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अनुभव

### सौ. स्मिता माने M.Sc. M. Ed. B. A. (संस्कृत )

- सहविचार समिती सदस्य
- विज्ञान व गणित अध्यापिका
- माजी विद्यार्थिनी

# खाते रचना

## श्री. शिवराज पिंपुडे

- व्यवस्थापन

## श्री. समाधान सुसर

- मूल्यमापन व etech प्रणाली

## सौ. स्मिता माने

- शैक्षणिक गुणवत्ता

## सौ. वर्षा जाधव

- प्रबोधिनी विचार

## सौ. बबिता आंबेकर

- सांस्कृतिक विभाग

# खाते रचना

श्री. अशोक कामथे

- कला क्रीडा शिस्त

सौ. शुभांगी सुपे

- etech प्रणाली सहाय्यक

सौ. सीमा महाजन

- पालक शिक्षक संघटन

सौ. दीपाली सूर्यवंशी

- व्यवस्थापन सहाय्यक

सौ. स्वाती मोरे

- व्यक्तिमत्त्व विकसन

# विभागाची वैशिष्ट्ये

- राखी विक्री उपक्रम.
- अभिव्यक्ती विकसनाच्या नियमित तासिका, सादरीकरणात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग.
- ३ ते ५ दिवसीय निवासी मातृभूमी परिचय शिबिर
- क्रमिक शिक्षण संकल्पना समृद्ध करणाऱ्या क्षेत्र भेटी, तज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा.
- बाल विज्ञान राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धेत सलग तीन वर्षे विज्ञान प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड. सुवर्ण पदकाने सन्मानित प्रकल्प.
- NIE आयोजित नाट्य स्पर्धेत सलग दोन वर्षे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक. नाट्य स्पर्धेची लेखन, दिग्दर्शन, उत्तम अभिनेता, अभिनेत्री अशी अनेक पारितोषिके.

# विभागाची वैशिष्ट्ये

- अभ्यासपूर्ण अध्ययन अध्यापन प्रक्रिया.
- प्रेरणादायी, विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेणारा, नोंद ठेवणारा, गुणात्मक शिक्षक विद्यार्थी संवाद
- उपक्रमात पालकांचे उत्स्फूर्त  सहकार्य आणि सहभाग.
- पुस्तक पेटी योजना : प्रत्येक विद्यार्थ्याने अवांतर वाचन करावे यासाठी ग्रंथालयातील पुस्तकांची वयोगटानुसार विभागणी करून पुस्तकांची उपलब्धता. या योजनेमुळे ७वितिल प्रत्येक विद्यार्थ्याचे किमान ३० अवांतर पुस्तकांचे वाचन.

# विभागाचे यश




- २०१९ -२० या वर्षात हे सर्व उच्चांक मोडीत काढून विद्यार्थ्यांनी अनेक नवीन विक्रम प्रस्थापित केले. यंदा ६ वीं ब व क आणि ७ वी ब आणि क या चारही वर्गांनी एक लक्ष रुपयांची जोरदार  विक्री केली. विभागाचीही एकूण राखी विक्री रु. ५,७९,३८५ /-  इतकी भरघोस झाली. गेल्या वर्षी रु. १०५००/-  ही सर्वोच्च वैयक्तिक राखी विक्री होती. यंदा हा विक्रम एकुण सात जणांनी कु. लावण्या सोनटक्के, चि. अपूर्व बुरसे, कु. सृष्टी सुसर, कु. शार्वी कळसकर हे सहावीचे तर कु. अथिला पाटील, कु. आर्या कुलकर्णी आणि चि. अमेय शेवाळे ह्या सातवींच्या विद्यार्थ्यांनी  भरघोस विक्री करत मोडीत काढला आहे आणि सर्वोच्च राखी विक्री रु. २५०००/- हा नवीन उच्चांक  सातवी ब च्या अमेय शेवाळे ह्या विद्यार्थ्याने प्रस्थापित केलेला आहे


# बाल विज्ञान राष्ट्रीय प्रकल्प स्पर्धा

- राष्ट्रीय बाल विज्ञान प्रकल्प स्पर्धा जिल्हा स्तरावर सायन्स पार्क चिंचवड येथे २० नोव्हेंबर रोजी घेण्यात आली. या प्रकल्पात इयत्ता सातवीच्या **ओजस कोळंबे आणि देवश्री जाडकर यांनी शाकाहारी अन्नघटकांचा वापर करून जीवनसत्त्व B12 चा अर्क तयार करणे हा प्रकल्प सादर केला**. जिल्हा स्तरीय,विभागीय स्तरावर निवड होत होत हा प्रकल्प राज्यस्तरावर पोहचला आणि जुन्नर येथे सादर करण्यात आलेल्या एकुण ८४ प्रकल्पांमधून या प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. २७ डिसेंबर ते 31 डिसेंबर या कालावधीत त्रिवेंद्रम, केरळ येथे या प्रकल्पाचे सादरीकरण होणार आहे. या प्रकल्पास डॉ. दीप्ती धर्माधिकारी यांनी मार्गदर्शन केले होते. सौ. स्मिता माने यांनी प्रकल्पास सहाय्य केले. विभागप्रमुख श्री. शिवराज पिंपुडे यांनी प्रकल्पास आवश्यक ती सर्व मदत उभी करून दिली



# NIE आयोजित नाट्य स्पर्धा

- सकाळ माध्यम समूहाच्या 'सकाळ एनआयई व ज्ञान प्रबोधिनी निगडी यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित 'आंतरशालेय नाट्य स्पर्धेत' सकाळ माध्यम समूहाच्या 'सकाळ एनआयई व ज्ञान प्रबोधिनी निगडी यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित 'आंतरशालेय नाट्य स्पर्धेत' मराठी विभागात आपल्या 'श..श..शाळा हश्शा हश्शा' या एकांकिकेला प्रथम क्रमांक मिळालेला आहे.
  तसेच कु.परिणिता शिंदे उत्कृष्ट अभिनय मुली प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.
- सौ. मयुरी जेजुरीकर व सौ. मानसी फाटक यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते.



- कलापिनी नाट्य संस्था तळेगाव आयोजित 'आंतरशालेय नाट्य स्पर्धेत' दिनांक ९ फेब्रुवारी २०२० रोजी आपल्या 'श..श..शाळा हश्शा हुश्शा' या एकांकिकेला प्रथम क्रमांक मिळालेला आहे. त्याचप्रमाणे इतर श्रेणीमध्ये देखील या नाटकास पारितोषिके मिळालेली आहेत.
- १. सांघिक प्रथम २. दिग्दर्शन प्रथम ३. संगीत साथ( पार्श्वसंगीत)प्रथम ४. लेखन द्वितीय
- ५. उत्कृष्ट अभिनय (मुले) प्रथम : प्रणव धर्माधिकारी
- ६. उत्कृष्ट अभिनय ( मुली) तृतीय : परिणीता शिंदे



चिंचवड

ज्ञानप्रबोधिनी' प्र

विद्यानिकेतन, तर इंग्रजीत जनता विद्या मंदिरल

'च्या 'सकाळ एनआयई' व
च्या संयुक्त विद्यमाने आयोजित
भागात ज्ञानप्रबोधिनीच्या 'श. श.
हिंदी विभागात साने गुरुजी आदर्श
ांनी तर इंग्रजी विभागात जनता विद्या
मिळविला.



केले. विजेत्या शाळांना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

सविस्तर निकाल (विभाग व भाषानिहाय) : पिंपरी चिंचवड (मराठी) : प्रथम- ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय निगडी (श. श. शाळा, हश्शा हुश्शा), द्वितीय- सिटी प्राईड हायस्कूल (वुईच कलर डू यू वॉन्ट), तृतीय- एच. ए. विद्यालय (आणि पृथ्वी बोलू ...गली), चतुर्थ- कन्या विद्यालय ...ी (हिरवा जागर एक झणझणीत ...), पंचम- शिक्षण प्रसारक मंडळी

मराठी माध्यम प्राथमिक शाळा (मंत्र दिला शिवरायांनी). पिंपरी चिंचवड (हिंदी विभाग) : प्रथम- साने गुरुजी आदर्श विद्या निकेतन थेरगाव (सोशल मीडिया), द्वितीय- एस. पी. एम इंग्लिश स्कूल निगडी (चलो हवा आने दो पानी संघर्ष), तृतीय- श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय (वीर शतमन्यू), चतुर्थ- सौ. ताराबाई शंकरलाल मुथा कन्या प्रशाला चिंचवडगाव (पेडो कि पंचायत).

उत्कृष्ट अभिनय : प्रथम- प्रणिती शिंदे (ल्साविं)- ज्ञानप्रबोधिनी नवनगर

विद्यालय निगडी, (वेद)- सिटी प्राई... उत्कृष्ट दिग्... कांबळे (सोशल... आदर्श विद्या नि... लेखन- मीनल सा... पिंपरी) हिरवा ... अंजन, रंजना चौ... हायस्कूल) चला... संघर्ष. उत्कृष्ट नेप... (वुईच कलर डू यू... : प्रथम- जनता... ता. आंबेगाव ... द्वितीय- मॉडर्न... (सायबर ॲडिक... एम हायस्कूल य... मिडिया बेन अ... ताराबाई शंकरल... चिंचवड (वेक अ...



# अभिवाचन स्पर्धा राज्यस्तरीय यश

- **छात्र प्रबोधन आयोजित अभिवाचन** स्पर्धेत ज्ञान प्रबोधिनी गटास **राज्यस्तरीय प्रथम क्रमांक** मिळाला; या  आनंदाच्या बातमीने झाली. या अभिवाचनाची संहिता शाळेची विद्यार्थिनी **शांभवी देशपांडे** हिने लिहिली होती. वादय साथ **अभिलाषा साळुंखे** आणि **सुघोष राऊत** यांनी केली. श्रावणी दीक्षित, सुजा खातू, सुयश देशपांडे, ओम तळेपे, सांज भागवत, स्वरा दिकोंडा आणि प्रज्ञा देशपांडे हे विदयार्थी सहभागी होते. या संपूर्ण गटाला सौ. मयुरी जेजुरीकर आणि सौ. मानसी फाटक यांनी मार्गदर्शन केले होते

# आदर्श शाळा सन्मान

- ¡
- ¡• संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान पिंपरी चिंचवड पतंजली योग समिती द्वारा आयोजित नैतिक शिक्षण योजना अंतर्गत इयत्ता पाचवी ते आठवी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा शनिवार दिनांक ११ जानेवारी रोजी घेण्यात आली. यासाठी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी गोष्टीरूप रामायण इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी चरित्र रामायण तर सातवीच्या विद्यार्थ्यांनी महाभारत या पुस्तकाचा अभ्यास केला. सर्व विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. भाषा विषयाचे आकारिक तंत्र म्हणून या अभ्यासाचा विचार गृहीत धरण्यात आला. या प्रतिष्ठान तर्फे शाळेस "आदर्श शाळा" म्हणून सन्मानित करण्यात आले.
- ¡

# मातृभूमी परिचय शिबिर

- आईवडिलांपासून लांब राहणे, स्वावलंबन, आजूबाजूच्या परिसराचे भौगोलिक, ऐतिहासिक स्वरूप अभ्यासपूर्ण पाहणे, नवीन प्रदेशातील व्यक्तींची भाषा, वेशभूषा , राहणीमान यांचा अभ्यास करणे ही या शिबिराची उद्दिष्टे होती.
- औरंगाबाद येथील शिबिरात  रांजणगाव महागणपती, प्रवरा संगमावरील सिद्धेश्वर मंदिर, सिल्लोड सिंदखेडराजा येथील जिजाबाईचे माहेर, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वीजनिर्मिती वाटिका , लोणार सरोवर, जांब गाव दर्शन या परिसरांना भेटी देण्यात आल्या. साखरपा येथील शिबिरात मार्लेश्वर मंदिर, देवरुख येथील Fine Art महाविद्यालय, रत्नागिरी येथील लोकमान्य टिळक निवासस्थान, सावरकरांचे पतित पावन मंदिर, पावस येथील स्वामी स्वरूपानंद मठ, मत्स्यालय, समुद्र किनारा या स्थानांना भेटी देण्यात आल्या.

# रत्नागिरी साखरपा शिबिर





# कार्यशाळा, क्षेत्र भेटी

- परिसरातील वृक्षांची  शास्त्रीय माहिती विद्यार्थ्यांना मिळावी यासाठी वृक्ष परिचय कार्यशाळा आयोजित करण्यात येत असते.
- स्थलांतरित पक्ष्यांचा अभ्यास करण्याच्या हेतूने भिगवण परिसरात पक्षी निरीक्षण सहल आयोजित करण्यात येते.
- निसर्ग निर्मित आणि मानव निर्मित देवराई चा परिचय विद्यार्थ्यांना करून देण्यात येतो.
- अशा प्रकारे निसर्गाच्या सान्निध्यात विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक नेले जाते,

# अध्यापक स्तर

- IISER येथे होणाऱ्या शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेत सौ. स्मिता माने यांची दवितीय स्तरावर निवड झाली. ४५ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत शैक्षणिक साधने अंतर्गत DNA आरोखडा व पेशी रचना याचे मॉडेल तयार करून स्पर्धेत सहभाग नोंदवला.
- DICPD पुणे आणि शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड यांच्यादवारे आयोजित 'शिक्षण परिषदेत' दि. २७/११/१९ श्री.समाधान सुसर हे सुलभक(प्रशिक्षक) म्हणून गेले होते. या शिक्षण परिषदेत ६० ते ६५ अध्यापक सहभागी होते.. माझा वर्ग-माझा उपक्रम' या सत्रात त्यानी 'राखीविक्री उपक्रमाबाबत' मांडणी केली. तसेच 'आकारिक व संकलित मूल्यमापन' कसे केले जावे याबाबत मार्गदर्शन केले.

# दुर्गजागर

- विभाग प्रमुख श्री. शिवराज पिंपुडे यांनी 22 एप्रील २०१९ ते २६ जानेवारी २०२० या कालावधीत दुर्गजागर मोहिमेचे आयोजन केले होते. विद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी या कालावधीत पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले मार्गदर्शकांच्या सहाय्याने यशस्वीपणे सर केले. या मोहिमेत इयत्ता सातवीचे तन्मय नाईक, समर्थ पानसे आणि प्रथमेश म्हात्रे हे तीन विद्यार्थी सहभागी होते. त्यांच्या यशाबद्दल विभागातर्फे अभिनंदन!!!